# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-हस्तदेय/२०२०　　　　　　　　　　दि. १८ डिसेंबर, २०२०

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांमधून एम.एस्सी. रसायनशास्त्र या विषयात प्रथम येणाऱ्या अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती या संवर्गाच्या विद्यार्थी/ विद्यार्थिनीस **“कालकथित हिरामण त्र्यंबक मोरे सुर्वण पदक“** प्रदान करण्यासाठी प्रा.धनंजय हिरामण मोरे यांनी दोन लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू प्रा.पी.पी. पाटील यांच्याकडे सुपूर्द केला.

प्रा. धनंजय हिरामण मोरे हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रासायनिक प्रशाळेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या वडीलांच्या नावे हे सुवर्णपदक जाहिर केले आहे. त्यासाठी दोन लाख रुपयांचा धनादेश त्यांनी कुलगुरुंकडे सुर्पूर्द केला. यावेळी यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर, अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील हे उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

----------------------

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी